क्रमांक : ६०

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२० / आषाढ १५, १९४२ (शके)

### लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**६०.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते कि, सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) सत्र शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील एकूण **३२** निवेदने आता शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : ६ जुलै, २०२०.

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

E:\2020 THIRD SESSIoN\Lakshvedhi\Nivedan vitrit.doc

लक्षवेधी सूचना क्रमांक :-

श्री. सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अमिन पटेल, श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे. :-

"चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखेने कोळशाने भरलेले २४ ट्रक माहे फेब्रुवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवड्याच्या दरम्यान ताब्यात घेतले असून या प्रकरणात कोळशाच्या अफरातफरीचा ठोस पुरावा न मिळाल्याने अद्याप कुणावरही गुन्हा दाखल झाला नसल्याची बाब उघडकीस येणे, खनिकर्म महामंडळानेसुद्धा या कोळशाबाबत स्थानिक गुन्हे शाखेकडे खुलासा केलेला नसणे, गेल्या वर्षभरापासून संबंधित कंपन्यांच्या मागणीची महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने तपासणीच केली नसल्याची धक्कादायक माहिती समोर येणे, वास्तविक मागणी असलेला कोळसा खाणीतून ट्रकद्वारे उचलून तो ठराविक भूखंडावर टाकून त्याचे स्क्रिनिंग करुन अनावश्यक घटक काढून उरलेला कोळसा हा ट्रकद्वारे उचलला जात असताना त्याची नोंद खनिकर्म विभागाकडे असून, स्क्रिनिंग केल्यानंतर मागणी असलेल्या ठिकाणी हा कोळसा पोहचतो वा नाही, या कंपनीला नेमकी किती कोळशाची गरज आहे, याची नोंद खनिकर्म विभागाकडे असताना गेल्या ८-१० महिन्यांपासून खनिकर्म महामंडळाकडून अशी कोणतीही मागणी झालेली नसल्याने खाणीतून उचलेल्या कोळशाबाबत संभ्रमाची निर्माण झालेली स्थिती, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखा यांना दि. १७/०२/२०२० ते दि. १८/०२/२०२० या कालावधीत कोल माईन्समधून निघालेला कोळसा हा संबंधित कंपनीत जाणे आवश्यक असतानाही अवैधरीत्या पोलीस स्टेशन, घुग्गस परिसरातील ग्राम नागाळा, जि. चंद्रपूर येथे गावाजवळ खाली करण्यात येत आहे अशी माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी ग्राम नागाळा येथील श्री. कैलास अग्रवाल व संजय जैन यांच्या कोल डेपोवर जाऊन पाहणी केली असता, तेथे एकूण २५ कोळशाचे ट्रक मिळून आले. त्यापैकी एका ट्रकमधील कोळसा उतरवलेला असून, इतर ट्रकमधील कोळसा उतरविण्याच्या बेतात होते. सदर ट्रकचालकाकडे चौकशी केली असता, त्यांनी गेट पास सादर केला आहे. त्यामध्ये कोळशाचे डिओ (Delivery Order) हे महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांच्या नावाचे असल्याचे आढळून आले. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांनी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांना दि. २०/०२/२०२० च्या पत्रान्वये पोलीस स्टेशन, घुग्गस, जि. चंद्रपूर परिसरात कोळशाने भरलेले व अर्धवट खाली केलेले २७ ट्रक मिळून आले आहेत असे कळविले होते. त्या अनुषंगाने महामंडळाने दि. २०/०२/२०२० रोजी पोलीस निरीक्षक यांना शासन नियुक्त यंत्रणेमार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या कोळशाच्या वापराबाबत मार्गदर्शक तत्त्वांची माहिती व

पोलीसांनी दि. १८/०२/२०२० रोजी करण्यात आलेली चौकशीची माहिती लक्षात घेता, कोळशाच्या गैरवापरावर व परिवहनात अनियमितता दिसून आल्यास चौकशी अहवाल महामंडळास सादर करावा. जेणेकरुन महामंडळास नियमानुसार कार्यवाही करता येईल असे कळविले होते. तद्नंतर पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांनी दि. २४/०२/२०२० च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळास वरील प्रमाणे नमूद केलेल्या घटनेत २७ ऐवजी २५ ट्रकचा उल्लेख करुन योग्य ती चौकशी करुन गैरव्यवहार होत असल्याचे आढळून आल्यास पोलीस स्टेशन, घुग्गस येथे तक्रार करावी असे कळविले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने मे. रोशन लाईम वर्क्स, राजूर, ता. वणी, जि. यवतमाळ च्या मालकाने त्यांना आवंटित झालेल्या १७१.०० मेट्रिक टन कोळशापैकी १००-८७ मे.टन. ची आवश्यकता नसतानाही उचल करुन बनावट कागदपत्र तयार करुन श्री. कैलास अग्रवाल/शहेजाद शेख यांच्यासोबत संगणमत करुन महामंडळाची दिशाभूल करुन फसवणूक केली आहे अशी तक्रार दि. २४/०२/२०२० रोजी १९.१८ वा. पोलीस स्टेशन, घुग्गस येथे केली आहे. त्या अनुषंगाने पोलीस ठाणे यांनी संबंधितांविरुद्ध गु.र.क्र. ४९/२०२० हा भा.द.वि. संहीत कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ व ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांच्यामार्फत सुरु आहे.

महाराष्ट्र राज्यातील सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना शासन नियुक्त यंत्रणेमार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या कोळशाच्या वाटपासंदर्भात मार्गदर्शक तत्वे दि. १२/०७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार जिल्हास्तरीय वाटप समितीद्वारे केलेल्या कोळशाच्या मात्रेनुसार महामंडळाद्वारे उद्योग घटकांसोबत वार्षिक कोळसा पुरविण्याकरीता ०२ वर्षाच्या कालावधीसाठी इंधन पुरवठा करारनामा करण्यात येतो. त्यामध्ये उद्योग घटकांची मागणी व केंद्र शासनसाच्या एमएसएमईने दिलेल्या उद्योगाच्या क्षमता प्रमाणपत्रानुसार मासिक कोळसा मात्रा उद्योगाला किती लागणार, या संदर्भात इंधन पुरवठा करार करुन दर महिन्याला वेस्टर्न कोलफिल्ड लि. (WCL) यांच्यासमवेत केलेल्या करारनाम्यानुसार त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कोळशाप्रमाणे उद्योग घटकासोबत झालेल्या इंधनपुरवठा करारानुसार कोळशाची मात्रा उद्योग घटकाला आवंटित केली जाते. तथापि, शासन नियुक्त यंत्रणेकडून केलेली मागणी व वेस्टर्न कोलफिल्ड यांनी उपलब्ध करुन दिलेली कोळशाची मात्रा यामध्ये तफावत असल्यास उद्योग घटकांना प्रो-राटा काढून उद्योग घटकाला आवंटित करण्यात येतो.

तसेच उद्योग घटकाकडून आलेली वास्तविक मागणी लक्षात न घेता, तसेच वाटप करण्यात आलेल्या कोळसा खाणीतून उद्योग घटकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी उद्योग घटकाची असते. तद्नंतर कोळसा उद्योग घटकाच्या ठिकाणी पोहोचवल्यानंतर ट्रकचे गेट पास व किती कोळसा उचल करण्यात आलेला आहे तसेच विद्युत देयके, जीएसटी रिटर्न इ. बाबतची माहिती उद्योग घटकाद्वारे महामंडळास सादर करणे आवश्यक असते. दर तीन महिन्यामध्ये किती कोळशाची उचल झालेली आहे आणि किती कोळसा वापरण्यात आलेला आहे तसेच उद्योग घटकात शिल्लक असलेल्या कोळशाची संपूर्ण माहिती उद्योग घटकास महामंडळाला विहीत नमुन्यातील परिशिष्ट ६ नुसार सादर करणे आवश्यक आहे.